**Estd 1962**
**Naac 'A+++' Grade**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दि.१९/३/२०२२

कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर २०२१ हिवाळी सत्राच्या एकुण ६६४ अभ्यासक्रमाच्या परीक्षापैकी विद्यापीठस्तरावरील **३६२** परीक्षांपैकी ब–याच परीक्षांना दि.१४ फेब्रुवारी २०२२ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरवात झाली आहे.

आज दि. **१९ मार्च** २०२२ रोजी BBA, BA, MA, BCA, MCA, BJ, MJ, B.Sc., MSc, B.Com., M.Com., BSW, MSW, M.Lib., B.Lib., PG Degree in Master of Valuation, MA/MSc (Geography), MBA in Rural Management, MRS, BSc/MSc Nano Sc, M.Tech (Rural Technology), BSc (Computer Sc./Sugar Technology, Food Sc. & Technology ) या अभ्यासक्रमाच्या एकुण **७७** विषयांच्या परीक्षा पार पडल्या. आजच्या **परीक्षेसाठी १८०६०** विद्यार्थ्यापैकी **१७४६४** विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. परीक्षेस विद्यार्थ्याच्या उपस्थितीचे प्रमाण हे शेकडा **९६.७० टक्के** इतके होते.

आज परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी एकुण **१६९** विद्यार्थी परीक्षा देत असताना संशयास्पदरित्या हालचाल करताना विद्यापीठाच्या विशेष पथकास आढळून आले असून त्यांच्यावर विद्यापीठ नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

आज **दि.१९ मार्च** २०२२ रोजी **B.A. Sem – V & VI, B.A. (Dress Making & Fashion Co-ordination) Sem – III & V, M.A. (Sanskrit) Sem – III, B.Sc. (FTM)Sem – V, M.Sc. (Statistics) Sem- III, M.Sc. (Applied Statistics & Information) Sem – III, M.A. (Marathi) Sem – III & IV** अशा एकुण **१२** परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले असून **आजपर्यंत एकुण १६५** परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत.

या परीक्षेपासून विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा–या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रॉक्टरींग पध्दत सुरु केली आहे. यासाठी विद्यापीठाकडून विशेष पथक नेमण्यात आले आहे. सदर पथकाकडून आज कामकाज करुन प्रत्यक्ष हेडफोन वापरुन गैरप्रकार करणा–या, अन्य मोबाईल वापरुन इतरांशी दूरध्वनीवरुन बोलणारे, एकाच फ्रेममध्ये दोन विद्यार्थी दिसणारे इ. अशा विद्यार्थ्यांवर गैरप्रकार म्हणून प्रत्यक्ष नोंद करुन परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई विद्यापीठामार्फत करण्यात येणार आहे. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच ऑनलाईन परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी दिली.